विषय:-दैनंदिन जमा रक्कमेची चलने
लेखा शाखेमध्ये जमा करणेबाबत....

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
**लेखा विभाग**
परिपत्रक क्र. लेखा/२० /कावि/५८४८/२०२१
दिनांक :-१२/०७/२०२१

**परिपत्रक,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांद्वारे दररोज विविध कारणांसाठी नागरिकांकडुन विविध प्रकारचे कर, फी, शुल्क आकारणी करून ते बँकेत / म.न.पा.च्या कोषागरात जमा केले जाते. त्यासाठी प्रत्येक विभागांद्वारे जमा झालेल्या रक्कमेची चलने तयार केली जातात. प्रत्येक विभागाने अशा प्रकारे संगणक प्रणाली/ मॅन्युअल द्वारे तयार झालेल्या चलनाची एक प्रत लेखा विभागात सादर केली जाते.

परंतु सद्यस्थितीत माझे असे निदर्शनास आले आहे की, म.न.पा.च्या काही विभागांतुन दैनंदिन भरणा चलने वेळेवर लेखा विभागात प्राप्त होत नाहीत. त्यामुळे मनपाचे आर्थिक हिशोबाचे दस्त / कागदपत्रे हे अद्यावत तयार करणे लेखा विभागास शक्य होत नाही. त्यामुळे मनपाचे आर्थिक हिशोबाचे दस्त तयार करण्यासाठी अडचण निर्माण होत आहे. **पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे सध्या कर्जरोखे उभारणीचे कामकाज प्रगतिपथावर आहे. यासाठी म.न.पा.ची आर्थिक हिशोबाची पुस्तके अद्यावत असणे आवश्यक आहे. त्यासाठी सर्व विभागप्रमुखांचा क्रियाशिल सहभाग अत्यंत महत्वाचा व आवश्यक आहे. याकामी मनपाचे सर्व विभागांद्वारे त्यांचेकडील सर्व निधींच्या नागरिकांकडुन वसुलात आणलेल्या कर / फी / शुल्क इ.ची जमा भरणा चलने जास्तीत जास्त उशिरा म्हणजे (दुसरे दिवशी) अथवा पुढील लगतचे कामकाजाचे दिवशी योग्य त्या सर्व सही / शिक्क्यासह लेखा विभागामध्ये जमा होणे तितकेच महत्वाचे आहे.**

**तसेच या परिपत्रकान्वये सर्व संबंधित विभागप्रमुखांना असे निर्देशित करण्यात येत आहे की, त्यांनी दर सोमवारी मागील आठवड्यातील त्यांचेकडील सर्व निधींच्या जमा चलनांचा गोषवारा त्यांचे सही शिक्क्यानिशी खाली नमुद केलेल्या विहित नमुन्यामध्ये लेखा विभागामध्ये सादर करणेबाबत सर्व संबंधित विभागप्रमुखांनी कार्यवाही करावी.**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११०१८**
**----------------- विभाग**

| दिनांक | वार | रोख जमा र.रू. | चेक/DDद्वारे जमा र.रू. | RTGS/NEFT द्वारे जमा र.रू. | ऑनलाईन व्यवहार द्वारे जमा र.रू. | एकुण जमा र.रू. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |

१२/७/२१

(राजेश पाटील)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८

प्रति,

१) सर्व संबंधित विभागप्रमुख
२) सर्व विभागातील संबंधित लेखाधिकारी/लेखापाल/उपलेखापाल